**नियमीत दिवाणी दावा क्र.६४/२०२२ मधील नि.क्र.४५ वरील आदेश**

**( मनोहर रामचंद्र वाघमोडे विरुध्द श्रीमती मंगल बाळासो गायकवाड वगैरे)**

**CNR No.MHSN020002352022**

१. वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द निरंतर ताकीदीकरिता, आज्ञार्थी ताकीदीकरीता व ठरावाकरीता मुळ दावा दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दावा मिळकतीच्या पश्चिम बोळात खड्डे खणून, सळया उभ्या करुन, वादी यांना ये–जा करण्यासाठी अडथळे निर्माण केलेले आहेत. त्यामुळे त्या सळया काढून, खड्डे मूजवून वादींचा जाणेयेणेचा बोळ पुर्ववत करावा असा तुर्तातुर्त आज्ञार्थी मनाईचा आदेश प्रतिवादींविरुध्द मिळणेसाठी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**वादीचे अर्जाविषयची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

२. सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीतील सांगली शहरातील खणभाग परिसरातील सिटी सर्वे क्र.४०४ मधील पश्चिमेकडील भाग त्याचे क्षेत्रफळ २०२४ चौ. फूट म्हणजेच १८८.१० चौ. मी. ही जागा हा तक्रार अर्जाचा विषय आहे.

३. वादींच्या दाव्याला अनुषंगून त्यांनी यापूर्वी तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज दिलेला होता, तेसेच त्यांनी कोर्ट कमिशनरचा अर्ज देवून दावा मिळकतीची पाहणी देखील करण्यात आलेली होती. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेची परवानगी न घेता त्यांच्या घराची बेकायदेशीररित्या पाडापाड सुरु केलेली होती. त्यामुळे वादी यांनी वेळोवेळी महानगरपालिकेकडे तक्रारी केलेल्या होत्या.

परंतु कोर्टाला उन्हाळी सुट्टी लागली आहे याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत खड्डे खणायला व सळया उभ्या करण्यास सुरुवात केली. त्यामुळे वादींना दावा मिळकतीमधून वहीवाट करणे खूप अडचणीचे झालेले आहे.

४. त्यामुळे बोळ रस्त्यात प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी खड्डे खणून, सळया काढून जे बांधकाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते बांधकाम थांबवून खड्डे मूजवून वादींचा जाणेयेणेचा बोळ पुर्ववत करावा असा तुर्तातुर्त आज्ञार्थी मनाईचा आदेश प्रतिवादींविरुध्द मिळणेसाठी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी क्र.३ यांनी नि.क्र.५१ कडे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीच्या मुळ दाव्यातील व तक्रारी अर्जातील सर्व कथने ही चुकीची आहेत. तसेच त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी जाणीवपूर्वक नि.क्र.५ चा अर्ज चालविलेला नाही. तसेच मे. कोर्टाने प्रतिवादीने बांधकाम करु नये असे आदेश दिलेले नसल्यामुळे त्यांचे दावा मिळकतीतील बांधकाम पुर्ण झालेले आहे. त्यामुळे वादींचा अर्ज हा आहे त्या स्वरुपात टिकण्यासारखा नाही असे प्रतिपादन करुन प्रतिवादी यांनी वादींचा आज्ञार्थी ताकीदीचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. .

६. वादी व प्रतिवादी क्र.३ यांच्या परस्परविरोधी कथनांवरुन पुढील मुद्दे विचारार्थ घेतले. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांनी प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय ? | **... होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाची तुला वादी यांच्या बाजूने आहे ही बाब वादी यांनी शाबीत केली आहे काय ? | **... होकारार्थी.** |
| ३. | आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर केल्यास कोणास अधिक नुकसानीस सामोरे जावे लागेल ? | **...वादीस.** |
| ४. | कोणता आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ बाबत** :–

७. सदरहु अर्जाला अनुषंगून वादी यांनी दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

८. सदरहु अर्ज हा आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा असल्यामुळे केसचे गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरीचे आहे. तसेच आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी केस कोणाचे बाजूने आहे, तसेच भविष्यात मुळ दावा वादीच्या बाजुने होवू शकेल का याची सर्वसाधारण पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच अर्ज नामंजूर केल्यास कोणाचे मोठया प्रमाणावर नुकसान होईल ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे.

९. सदरहु अर्जाला अनुषंगून वादी–प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. दाव्याला अनुषंगून प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेने जी नि.क्र.३६ कडे कैफियत दाखल केलेली आहे, त्याचे बारकाईने अवलोकन केले. दाव्यात व तक्रार अर्जात वादी यांना दावा मिळकतीमध्ये जाणे येणे

करीता त्यांच्या मिळकतीच्या पश्चिम बाजुकडून बोळ रस्ता आहे व त्या बोळ रस्त्या व्यतिरिक्त त्यांना त्यांच्या मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी कोणताही पर्यायी मार्ग नाही असे नमूद करण्यात आलेले आहे.

१०. वादीच्या तक्रारीला अनुषंगून नि.क्र.२७ कडे खरी वस्तुस्थिती समोर येण्याच्या दृष्टीने कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करण्याबाबत आदेश पारीत करण्यात आलेला होता. त्याला अनुषंगून ॲड. कुमार बलभीम पाटील यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. कोर्ट कमिशनर यांनी नि.क्र.३० कडे दावा मिळकतीची पाहणी करुन वस्तुस्थिती दर्शविणारा कच्चा हात नकाशा व त्यांचा अहवाल सादर केलेला आहे.

११. कोर्ट कमिशनर यांनी त्यांच्या कमिशन अहवालामध्ये वादी–प्रतिवादी यांच्यासह दावा मिळकतीची पाहणी केली असे नमूद केलेले आहे. तसेच त्यांनी कोर्ट कमिशनर अहवालामध्ये प्रतिवादी यांनी त्यांच्या मिळकतीमधील इमारत पाडलेली आहे व मिळकतीमध्ये बांधकाम करण्यासाठी खडी व वाळू आणून टाकलेली आहे असे नमूद केलेले आहे. तसेच कोर्ट कमिशनर यांनी त्यांच्या अहवालामध्ये दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडे पूर्वपश्चिम चालीचा बोळ रस्ता आहे असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. तसेच कोर्ट कमिशनर यांनी त्यांच्या अहवालामध्ये दावा मिळकतीमध्ये पूर्व, पश्चिम व उत्तर या बाजुने ये जा करण्यासाठी कोणताही रस्ता आढळून येत नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. तसेच दावा मिळकतीचे दक्षिण बाजुकडून पूर्व पश्चिम चालीचा बोळ पश्चिमेकडील

रस्त्यावर जा ये करण्यासाठी वादीस उपलब्ध आहे व त्या रस्त्याखेरीज अन्य कोणताही रस्ता वादी यांना जाणे येणेसाठी उपलब्ध नाही अगर अन्य कोणताही पर्यायी मार्ग नाही असे स्पष्ट मत कोर्ट कमिशनर यांनी त्यांचे कमिशनचे काम पूर्ण झाल्यानंतर नि.क्र.३० कडील अहवालामध्ये नमूद केलेले आहे.

१२. कोर्ट कमिशनर यांच्या नि.क्र.३० कडील अहवालाला अनुषंगून प्रतिवादी क्र.६ महानगरपालिका यांनी दाखल केलेल्या नि.क्र.३६ कडील कैफियतीचे अवलोकन केले.

१३. अत्यंत महत्वपूर्ण व विचार करण्यासारखी बाब म्हणजे वादी यांनी मुळ दाव्याचे कलम ११ मध्ये अनु क्रमांक ११अ ते ११इ कडे ज्या मागण्या केलेल्या आहेत, त्या मागण्या अशंतः ख–या व बरोबर आहेत, अशी स्पष्ट कबूली महानगरपालिकेने कैफियतीमध्ये दिलेली आहे. सदरहु मागण्यांमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादींच्या बोळ रस्त्यामध्ये हरकत अडथळे करु नयेत, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी बोळ रस्त्यात केलेले बांधकाम तोडून टाकण्यात यावे, तसेच बांधकाम बेकायदेशीर आहे असे ठरवून मिळावे अशा ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या बरोबर आहेत असे महानगरपालिकेचे म्हणणे आहे. तसेच महानगरपालिकेने त्यांच्या कैफियतीमध्ये दिनांक ०१/०१/२०२२ व ०८/०२/२०२२ रोजी वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या बांधकामा संदर्भात तक्रार केलेली होती ही बाब मान्य व कबूल केलेली आहे. तसेच सदरहु तक्रारीला अनुषंगून महानगरपालिकेने प्रतिवादी यांना दिनांक ०४/०३/२०२२

रोजी ते करत असलेल्या बांधकामा संदर्भात बांधकाम परवाना, मंजूर नकाशा, जागेचा मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्र सादर करण्याबाबत निर्देश दिलेले होते. परंतु तरी देखील प्रतिवादी यांनी कोणतेही कागद प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेकडे जमा केलेले होते, असे दिसून येत नाही.

१४. तसेच वादी यांना दावा मिळकतीमध्ये जाण्या येण्यासाठी बोळ रस्ता आहे अशी महत्वपूर्ण कबूली प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दिलेली आहे. तसेच अत्यंत महत्वपूर्ण बाब म्हणजे अर्जात नमूद केलेल्या बोळ रस्त्याव्यतिरिक्त अन्य कोणताही रस्ता वादी यांच्या मिळकतीकडे जाण्यासाठी नाही अशी स्पष्ट कबूली प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दिल्याचे दिसून येते. तसेच तथाकथीत बांधकामासाठी प्रतिवादी यांनी परवानगी मिळणेसाठी अर्ज केलेला नाही असे देखील प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेने त्यांच्या कैफियतीमध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

१५. अशा प्रकारे वादींच्या मिळकतीमध्ये जाण्या येण्याकरीता त्यांना सिटी सर्वे नं.४०४ मधील पश्चिम बाजुकडून जो बोळ रस्ता आहे त्याशिवाय कोणताही पर्यायी रस्ता नाही असे वादींचे, कोर्ट कमिशनर यांचे, तसेच प्रतिवादी क्र.६ महानगरपालिका यांचे म्हणणे दिसून येते.

१६. त्याला अनुसरुन कोर्ट कमिशनर यांनी नि.क्र.३० कडे त्यांचा विस्तृत अहवाल व कच्चा हातनकाशा सादर केलेला आहे. प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेने नि.क्र.३६ कडे त्यांची विस्तृत कैफियत दाखल करुन प्रतिवादी यांनी बांधकामासाठी

कोणतीही परवानगी घेतलेली नाही असे स्पष्ट प्रतिपादन केलेले आहे. तसेच प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये बांधकामासाठी साहित्य आणून टाकत आहेत अशा आशयाची तक्रार वादी यांनी दिनांक ०१/०१/२०२२ व ०८/०२/२०२२ रोजी केल्यानंतर महानगरपालिकेने दावा मिळकतीमध्ये जावून वस्तुस्थितीची पाहणी केली व त्यानंतर त्यांना वादी कथन करत असल्याप्रमाणे बोळ रस्त्याव्यतिरिक्त वादींच्या मिळकतीमध्ये जाण्यास कोणताही पर्यायी रस्ता नाही असे आढळून आलेले होते असे त्यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये नमूद केले आहे. त्यामुळे त्यांनी त्या कारणास्तव वादींच्या मुळ दाव्यातील मागण्या मान्य करण्यास हरकत नाही असे देखील प्रतिपादन केलेले आहे.

१७. निर्विवादपणे दाखल कागदपत्रांवरुन व कमिशनर यांच्या अहवालावरुन, तसेच प्रतिवादी क्र.६ यांच्या नि.क्र.३६ कडील कैफियतीवरुन वादी यांना त्यांच्या दावा मिळकतीमध्ये जाण्यायेण्याकरीता पश्चिम बाजूकडच्या बोळ रस्त्याशिवाय कोणताही रस्ता उपलब्ध नाही असे दिसून येते.

१८. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे तथाकथित बोळ हा त्यांच्या मालकीचा आहे. परंतु अशा प्रकारे स्वतःच्या मालकीच्या मिळकती मधील काही जागा बोळ म्हणून इतरांना वहीवाटीसाठी प्रतिवादी मोकळी ठेवतील असे प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

१९. अशी सर्व परिस्थिती असताना, तसेच मे. कोर्टात नि.क्र.५ चा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज प्रलंबित असताना, तसेच दिवाणी कोर्टाला उन्हाळी सुट्टी लागली याचा

गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दिनांक १२/०५/२०२२ रोजी नंतर येणा–या सुट्टया विचारात घेवून बोळ रस्त्यामध्ये खड्डे खणून, सळया उभ्या करण्यास सुरुवात केली अशी गंभीर तक्रार वादी यांनी केलेली आहे. सदरहु तक्रारीला अनुषंगून वादी यांनी तथाकथीत हरकतीला अनुषंगून नि.क्र.४६ कडील कागदयादी सोबत बोळ रस्त्यात सळया उभ्या केल्याचे दोन फोटोग्राफस दाखल केलेले आहेत. तसेच नि.क्र.४३ कडील कागदयादी सोबत प्रतिवादी यांनी बोळ रस्त्यामध्ये खड्डे खणलेले आहेत असे एकून दोन फोटोग्राफस दाखल केलेले आहेत. तसेच तथाकथीत प्रतिवादींच्या कृतीला अनुषंगून वादी यांनी दिनांक १२/०५/२०२२ रोजी आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे देखील कारवाई करण्याबाबत तक्रारी अर्ज केलेला होता. त्या अर्जाची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे.

२०. त्यामुळे बोळ रस्त्यामध्ये प्रतिवादी यांनी बांधकाम करण्याच्या दृष्टीने खड्डे खणलेले आहेत, तसेच त्या ठिकाणी सळया उभ्या केलेल्या आहेत असे वादी यांनी दाखल केलेल्या फोटोग्राफ्सवरुन स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी हे त्यांच्या मिळकतीत करत असलेले तथाकथीत बांधकाम हे महानगरपालिकेची परवानगी न घेता करत आहेत असे महानगरपालिकेच्या कैफियतीवरुन दिसून येते. त्यामुळे जर संबंधीत बोळामध्ये अशा प्रकारे बांधकाम प्रतिवादी यांनी केले तर प्रतिवादी यांची निश्चितच घरी जाण्यायेण्याची कुचंबणा होवू शकेल.

२१. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचेविरुध्द बांधकाम थांबविण्यात यावेत

असे कोर्टाचे आदेश नसल्यामुळे त्यांनी दावा मिळकतीतील बांधकाम पुर्ण केलेले आहे. परंतु अशा प्रकारे दावा मिळकतीतील बांधकाम प्रतिवादी यांनी पुर्ण केले या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे अगर फोटोग्राफ्स प्रतिवादी यांनी केसकामी सादर केलेले नाहीत. त्यामुळे वादी यांनी दाखल केलेल्या फोटोग्राफ्स वरुन प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये व बोळामध्ये खड्डे खणून व सळया उभ्या करुन बांधकाम करण्याच्या प्रयत्नात आहेत ही बाब वादी यांना प्रथमदर्शनी शाबीत करता आलेली आहे.

२२. त्यामुळे वादग्रस्त बोळाशिवाय वादी यांना त्यांच्या घरी जाण्यायेण्याकरीता कोणताही पर्यायी रस्ता नाही ही बाब वादी यांना प्रथमदर्शनी शाबीत करता आलेली आहे. त्यामुळे जर प्रतिवादी विरुध्द आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश पारीत केला नाही तर, वादी यांना त्यांच्या मिळकतीमध्येच वहीवाट करण्यास प्रतिरोधीत केल्यासारखे होवू शकेल. तसेच प्रतिवादी यांनी त्यांच्या मिळकतीमध्ये बांधकाम करत असताना जर ते बांधकाम बोळ रस्त्यात पुर्ण केले गेले तर, वादी त्या बोळ रस्त्याचा वहीवाटीसाठी उपयोग करु शकणार नाहीत व त्यामुळे वादीची परिस्थिती landlock केल्यासारखी होवू शकेल. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांवरुन प्रतिवादी जे बांधकाम करत आहेत, त्यावरुन वादींचा बोळ रस्ता हा बंद होण्याची शक्यता आहे ही बाब वादी यांना शाबीत करता आलेली आहे. त्यामुळे वादी यांना प्रथमदर्शनी केस शाबीत करता आलेली आहे. तसेच न्यायाची तुला देखील वादी यांच्या लाभात आहे. सबब मुद्दा क्र.१ व २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्र.३ बाबत :-**

२३. उपलब्ध कागदपत्रांवरुन, तसेच मुद्दा क्र.१ व २ यांच्या निष्कर्षावरुन वादी यांना प्रथमदर्शनी केस शाबीत करता आलेली आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ हे प्रतिवादी क्र.६ महानगरपालिकेकडून परवानगी न घेता बांधकाम करत आहेत असे सकृतदर्शनी दिसून येत आहे. तसेच दावा मिळकतीच्या पश्चिम बाजूने जो बोळ रस्ता आहे त्यामध्ये देखील प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी खड्डे खणून सळया उभ्या केलेल्या आहेत असे वादी यांनी दाखल केलेल्या फोटोग्राफ्सवरुन स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे जर प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्याविरुध्द आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश पारीत केला नाही तर, प्रतिवादी क्र.१ ते ५ हे त्यांच्या मिळकतीमध्ये बांधकाम करतीलच, परंतु ते करत असताना वादीचा त्यांच्या मिळकतीमध्ये जा ये करण्याचा बोळ देखील बोळात केलेल्या बांधकामामुळे बंद होवू शकेल. त्यामुळे तसा वादी यांच्या घरी जा ये करण्याचा बोळ बंद झाला तर त्यांना त्यांच्या मिळकतीमध्ये जाणे येणेसाठी कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध राहणार नाही व त्यामुळे वादी हे त्यांच्या घराबाहेर जावूच शकणार नाहीत. त्यामुळे जर आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर केला तर वादी यांना अधिक गैरसोईस, त्रासास सामोरे जावे लागेल असे मला वाटते. सबब मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष वादीच्या लाभात नोंदविण्यात येतो.

२४. मुद्दा क्र.१ ते ३ चा साकल्याने विचार करता, नि.४५ कडील वादींचा आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकिद अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा नि.क्र.४५ कडील आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी सांगली खणभाग येथील दावा मिळकत सि.स.नं.४०४ मधील पश्चिमेकडील असणा–या बोळात खड्डे खणून, कॉलम घालण्यासाठी उभ्या केलेल्या सळया तात्काळ काढून घेण्यात याव्यात व बोळात काढलेले खड्डे तात्काळ मुजवून वादींचा जाण्या येण्याचा बोळ पुर्ववत करावा, अशी आज्ञार्थी तुर्तातुर्त ताकीद दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना देण्यात येत आहे.

३. सदरहु आदेशाची जर प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी तात्काळ कार्यवाही केली नाही तर वादी यांनी recourse of Law म्हणजेच कायदेशीर बाबींची पुर्तता करुन सदरहु बोळ रस्त्यामधील खड्डयात उभे केलेल्या सळया, खड्डे मुजविणे व बोळ रस्ता पुर्ववत करणे याची तजवीज करावी.

४. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबद्दल आदेश नाही.

(न्यायालयासमोर घोषीत करण्यात आले)

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2022.05.20 16:39:48 +0530

**ठिकाण : सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक : १८.०५.२०२२** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, सांगली.**

**प्र मा ण प त्र**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | तिसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | १८.०५.२०२२ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | २०.०५.२०२२ |